# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org


क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३०९/प्रनिप्रा/२८ मार्च/२०२४/७०५दिनांक : 8/4/24

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक २८ मार्च, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ८०व्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. मुरलीधर गोंविदराव चांदेकर, ख्यातनाम शिक्षणतज्ञ, २) डॉ. एन.एस. उमराणी, व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ञ व ३) श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. आणि श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

तसेच डॉ. दिनकर केकाणे, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई हे निमंत्रित संबंधित संचालकांच्या वतीने प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

विषय क्रमांक १ : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे (MBBS, BDS, PGO, PGP, MASLP & MSPO).

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

अखत्यारितीतील अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे संचालनालय स्तरावरील प्रवेश पडताळणी / छाननी प्रक्रिया झाल्यानंतर संबंधित अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांकडून प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणास अद्याप प्राप्त झालेले नाही. अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार संबंधित महाविद्यालयांकडून "प्रवेश मान्यता प्रस्ताव" अद्याप प्राप्त न झाल्यामुळे प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निर्णय घेणे शक्य नाही.

सदरील बैठकीस संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, मुंबई यांना विशेष निमंत्रित म्हणुन बैठकीस उपस्थित राहण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २२/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि संचालकांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी डॉ. केकाने बैठकीस उपस्थित होते.

उक्त नमूद केल्यानुसार महाविद्यालयांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे संबंधित महाविद्यालयांची संचालनालय स्तरावर तपासणी / छाननी प्रक्रिया कधी करण्यात आली, याबाबतचा तपशील संचालनालयाच्या प्रतिनिधींना दिनांक २८/०३/२०२४ रोजी पर्यंत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

प्रस्तूत प्रकरणी संचालनालयाचा अहवाल प्राधिकरणाच्या दिनांक २९/०३/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक २: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील एम.आय.एम.एस.आर. चे वैद्यकीय महाविद्यालय, लातुर येथील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशित डॉ. निखिल नंदवानी या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७(घ) मधील निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास त्रुटींमुळे प्रलंबित असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संबंधित संचालकांनी फेरपडताळणी करुन सादर केलेल्या अहवालानुसार पुर्नविलोकन अर्ज-निहाय प्रकरणे मान्यतेसाठी सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

एम.आय.एम.एस.आर. चे वैद्यकीय महाविद्यालय, लातुर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. निखिल नंदवानी यांच्या प्रवेश प्रकरणी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक १३/०६/२०२२ रोजीच्या अहवालामध्ये दर्शविलेल्या त्रुटीमुळे सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात आलेली होती.

डॉ. नंदवानी यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी दिनांक ३/१२/२०२२ रोजी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर सुनावणी घेण्यात आली व तद्नुषंगाने दिनांक १४/१२/२०२२ रोजीच्या निर्णयान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण / योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

या संदर्भात प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक २(ङ) मधील निर्देशानुसार संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना पुन:श्च पडताळणीकरिता दिनांक १७/१०/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानुसार संचालनालयाने दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या अहवालामध्ये डॉ. निखिल नंदवानी यांच्या प्रवेश मान्यतेबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे,-

| Sr. No. | Name of the College & College Code | DMER Re-verification Reports submitted to ARA | Eligibility |
|---|---|---|---|
| 1. | 1330 : Mr. Nikhil Narain Nandwani, Student / Review Applicant – Maharashtra Institute of Medical Sciences & Research Medical College, Latur | Eligible as per Hon'ble Supreme Court order in WP No. 1397 of 2020 and WP No. 1186/2021. | Eligible |

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अहवालानुसार सदरील प्रवेशाबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(ड) प्रपत्र-ड (अ.क्र. ३७) अन्वये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे,-

"सदरील प्रवेशाच्या मान्यते प्रकरणी संबंधित महाविद्यालयाने आवश्यक कागदपत्रे / माहितीसह पुनश्च तपासणी करिता उपस्थित राहण्याबाबत निर्देश देण्यात आले."

प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या निर्णयास अनुसरुन महाविद्यालयाने दिनांक २५/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये डॉ. नंदवानी यांच्या प्रवेश प्रकरणी सर्व आवश्यक / मूळ कागदपत्रे प्राधिकरणास सादर केली. तथापि, डॉ. निखिल नंदवानी यांनी दिनांक १७/०१/२०२४, २२/०१/२०२४ व १५/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता मिळण्याची विनंती केलेली आहे. संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अहवालात नमूद केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्रमांक १३९७/२०२० च ११८६/२०२१ मधिल आदेशाचे अवलोकन करण्यात आले.

वरील बाबी विचारात घेता एम.आय.एम.एस.आर. चे वैद्यकीय महाविद्यालय, लातुर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. निखिल नंदवानी यांच्या प्रवेश प्रकरणी संचालनालयाने दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालानुसार संबंधित विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरत असल्याची बाब स्पष्ट आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ख) **<u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांना प्राधिकरणाची मान्यता देण्याबाबत.</u>**

अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संबंधित संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर उच्च शिक्षण व आयुष शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले व या संदर्भात प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले,-

प्रस्तूत प्रकरणी संबंधित संचालकांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, १% प्राधिकरण स्तरावरील उपसमितीच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, तथापि या प्रकरणी 'प्रवेश मान्यता प्रस्ताव' सादर करण्याबाबत महाविद्यालयांकडून झालेल्या दिरंगाई/निष्काळजीपणा बाबत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील महाविद्यालयांना प्रत्येकी रु. २ लाख व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील महाविद्यालयांना प्रत्येकी रु. १ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरील संचालनालय/अभ्यासक्रम-निहाय <u>(प्रपत्र- अ/महाविद्यालय-निहाय )</u> प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे सर्व संबंधितांना बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी. याबाबतचा अभ्यासक्रम-निहाय गोषवारा खालील प्रमाणे आहे,-

| Sr. No. | Course | No of COllege | No. of Students Total Seats (Intake) | Total admitted | Vacancy | EWS & JK Admitted | Verification Report of Directorate | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Recommended for Approval | Not Recommended for Approval | Admission Cancelled |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| 1 | B.Ed | 2 | 200 | 186 | 14 | 0 | 185 | 0 | 1 |
| 2 | B.P.Ed | 1 | 100 | 25 | 75 | 1 | 26 | 0 | 0 |
| 3 | LLB 3 Year | 3 | 180 | 180 | 0 | 18 | 198 | 0 | 0 |
| 4 | LLB 5 Year | 3 | 180 | 143 | 37 | 11 | 150 | 2 | 2 |
| 5 | M.Ed | 1 | 50 | 17 | 33 | 0 | 17 | 0 | 0 |
| 6 | M.P.Ed | 1 | 20 | 20 | 0 | 0 | 19 | 1 | 0 |
| 7 | M.Eng | 1 | 90 | 32 | 58 | 0 | 32 | 0 | 0 |
| 8 | M.B.A | 2 | 201 | 94 | 107 | 0 | 201 | 0 | 0 |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| Sr. No. | Course | No of COllege | No. of Students Total Seats (Intake) | Total admitted | Vacancy | EWS & JK Admitted | Verification Report of Directorate | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Recommended for Approval | Not Recommended for Approval | Admission Cancelled |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| 9 | DSP | 2 | 26 | 25 | 1 | 0 | 24 | 1 | 0 |
| 10 | M.Pharmacy | 1 | 16 | 15 | 1 | 0 | 15 | 0 | 0 |
| **Total** | | **17** | **1063** | **737** | **217** | **30** | **867** | **4** | **3** |

४) तथापि, ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयांच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

५) प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे (प्रपत्र-अ), अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार) कार्यवाही करावी.

(ग) मा.प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अर्जनिहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर.

प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्रस्तूत प्रकरणी प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता सोबत जोडलेल्या प्रपत्र- ब मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि, महाविद्यालयाकडून झालेल्या निष्काळजीपणा ही गंभीर बाब विचारात घेता संबंधित महाविद्यालयास प्रपत्र-ब मध्ये नमूद केल्यानुसार दंड आकारण्यात येत आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच या संदर्भात उर्वरित प्रकरणे प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

(घ) <u>श्री. आयुर्वेद महाविद्यालय व पक्वासा रुग्णालय, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित कु. गायत्री संजय येवते यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.</u>

श्री. आयुर्वेद महाविद्यालय व पक्वासा रुग्णालय, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित कु. गायत्री संजय येवते यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणा समोर सुनावणीस महाविद्यालयाच्या वतीने श्री. राजेश एम. जोशी, लिपिक हे उपस्थित होते. संबंधित विद्यार्थीनी / पालक अनुपस्थित होते, याबाबत नोंद घेण्यात आली. सुनावणी दरम्यान उपस्थितांनी त्यांचे म्हणणे प्राधिकरणास सादर केले.

सुनावणी दरम्यान महाविद्यालयाचे प्रतिनिधींनी कु. गायत्री संजय येवते यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी नीट-युजी- २०२१ च्या माहिती पुस्तिकेतील प्रपत्र-ई (ANNEXURE - E) मध्ये विहित केलेल्या आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरले.

सबब वरील बाब विचारात घेता प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणा व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास असमर्थ ठरल्याने श्री. आयुर्वेद महाविद्यालय व पक्वासा रुग्णालय, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित कु. गायत्री संजय येवते यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात येत आहे.

(ङ) <u>साई आयुर्वेद मेडिकल कॉलेज आणि रिसर्च इन्स्टिटयूट, छत्रपती संभाजीनगर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दिपक बंडुप्पा परदेशी यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.</u>

प्रस्तूत प्रकरणी सुनावणीस महाविद्यालयाच्या वतीने श्री. पी.एम. चौधरी, मुख्य प्रवेश प्रक्रिया अधिकारी व कु. दिपक बंडुप्पा परदेशी संबंधित विद्यार्थी हे उपस्थित होते. सुनावणी दरम्यान उपस्थितांनी त्यांचे म्हणणे प्राधिकरणास सादर केले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये साई आयुर्वेद महाविद्यालय आणि रिसर्च सेंटर, संभाजीनगर येथे व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित ६० विद्यार्थ्यांपैकी एकूण ५९ विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये प्रवेश मान्यता देण्यात आली. उर्वरित ०१ विद्यार्थी कु. दिपक बंडुप्पा परदेशी या विद्यार्थ्याच्या प्रवेशामध्ये संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक ०६/०७/२०२३ रोजीच्या अहवालामध्ये *"Not Approved HSC & SSC Certificate original not shown."* अशी त्रुटी दर्शविण्यात आल्याने प्राधिकरणाची प्रवेश मान्यता देण्यात आली नाही.

संबंधित महाविद्यालयाने दिनांक २९/०३/२०२३ रोजी पुनर्विलोकन अर्ज सादर केला, या संदर्भात दिनांक २९/०६/२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक १७/०७/२०२३ रोजीच्या निर्णयान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

संबंधित महाविद्यालयाने दिनांक ३०/०८/२०२३ रोजी प्राधिकरणाकडे निवेदन सादर केले. सदरील निवेदन संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांना पुनःश्च पडताळणीकरिता दिनांक २१/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानुसार संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक २३/०१/२०२४ रोजीच्या अहवालामध्ये संबंधित विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे,

| Sr. No. | Name of the candidate | Discrepancy | Submitted Documents for Re-Reverification | Director's Remark |
|---|---|---|---|---|
| १. | कु. दिपक बंडुप्पा परदेशी | HSC & SSC Certificate original not shown. | संबंधित कागदपत्रे सादर केली आहेत. | पात्र |

संचालनालयाच्या पुनःश्च पडताळणीअंती कागदपत्रांची पुर्तता झाल्याने संचालकांनी पात्रतेची शिफारस केली आहे.

वरील बाबी विचारात घेता संचालनालय, आयुष शिक्षण, मुंबई यांच्या अहवालास अनुसरुन कु. दिपक बंडुप्पा परदेशी यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(च) <u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परिक्षेचे वेळापत्रक.</u>

आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परिक्षेचे वेळापत्रक प्राधिकरणास सादर केले. या संदर्भात सांगोपांग चर्चा करुन सदरील वेळापत्रकाची नोंद घेण्यात आली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत होणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेंच्या वेळापत्रकाची विद्यार्थी / पालक यांना परिपूर्ण माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदरील वेळापत्रकास विविध माध्यमातून मोठया प्रमाणात प्रसिध्दी देण्याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी यांनी उचित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सामाईक प्रवेश परिक्षेचे संबंधित अभ्यासक्रम निहाय प्रवेश प्रक्रिया नियम प्राधिकरणास अवगत करण्याचे निर्देश देण्यात आले.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई आणि प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.**

दिनांक : 8/4/24